प्रिया प्रमोद दिवेकर
वि.
प्रमोद प्रकाश दिवेकर व इतर

## फौजदारी किरकोळ अर्ज.क्र. ३५२/२०२१ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश

( दि. ३१/०१/२०२३ रोजी पारित केला )

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे कलम १९ खाली निवासी आदेश, कलम २० खाली आर्थिक सहाय्य असे अंतरिम आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार असे कथन करते की, सामनेवाला क्र. १ हा तिचा पती, सामनेवाला क्र. २ सासरे, सामनेवाला क्र. ३ हे मोठे दिर, सामनेवाला क्र. ४ जाऊ आणि सामनेवाला क्र. ५ ही नणंद असे नातेवाईक आहेत. अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह दि. ०३/०३/२०१९ रोजी हिंदु धर्मरिवाजाप्रमाणे मु. कोल, पोष्ट कोथेरी, तालुका महाड, जि. रायगड येथे झालेला आहे. सदर विवाहबंधनातुन अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांस एक मुलगा नामे कु. प्रज्वल झालेला आहे.

०३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, तिच्या विवाहाचा खर्च तिचा भाउ नरेश साबळे व मोठे भाउजी मारुती तांबडे यांनी केलेला आहे. सामनेवाला क्र. २ यांनी विवाह जमवतेवेळी सामनेवाला क्र. १ हा अभियंता असून पुणे येथे कंपनीमध्ये कामाला आहे असे त्यांना खोटे सांगितले होते. त्यावर विश्वास ठेवून अर्जदाराच्या माहेरच्या लोकांनी तिचा विवाह सामनेवाला क्र. १ सोबत लावून दिला होता. विवाहानंतर अर्जदार सामनेवाला क्र. १ याच्यासोबत पुणे येथे राहण्यास गेली. तेथे सामनेवाला क्र. १ हे कामाला जात नसल्यामुळे संसार उपयोगी वस्तू, रेशन इत्यादीची कमतरता भासत होती.

०४. अर्जदारचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. १ याने तिचे सोन्याचे गंठन परस्पर गहान ठेवले होते व तो त्या आलेल्या रकमेतून घरखर्च चालवत होता. गंठण

गहान ठेवल्याचे अर्जदाराला समजल्यानंतर तिने त्याबाबत सामनेवाला क्र. १ याच्याकडे विचारणा केली असता त्याने अर्जदाराला मारहाण केली होती. त्यानंतर अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे त्यांच्या कोल, ता. महाड जि. रायगड येथील एकत्र कुटुंबातील घरात सामनेवाला क्र. २ ते ४ यांच्यासोबत राहू लागले. तेथे राहत असताना अर्जदार गरोदर राहिली होती. त्यावेळी सामनेवाला यांनी तिला त्रास दयायला सुरुवात केली होती व सामनेवाला क्र. २ हा अर्जदाराला व सामनेवाला क्र. १ यांना स्वतंत्र राहण्यासाठी सांगत होता. त्याकारणावरुन सामनेवाला यांनी अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली होती.

०५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर ती व सामनेवाला क्र. १ आणि तिची सासू असे स्वतंत्र राहू लागले. तिला गरोदरपणामध्ये औषधोपचारासाठी पैशांची आवश्यकता होती. परंतु सामनेवाला क्र. १ हा कोणताही कामधंदा करत नसल्यामुळे तिच्या सासूला महाड येथे जाउन धुण्याभांडयाचे काम करावे लागत होते व त्यातून येणा-या पैश्यांतून तिच्या औषधोपचाराचा खर्च भागवला जात होता. सामनेवाला क्र. १ हा कोणताही कामधंदा न करता रोज दारुचे सेवन करुन तिला मारहाण व शिवीगाळ करीत होता. त्यानंतर दि. ०९/०९/२०२० रोजी अर्जदाराची प्रसुती होउन तिला मुलगा झाला. परंतु त्यावेळी देखील दवाखान्याचा संपूर्ण खर्च अर्जदाराच्या माहेरच्या लोकांनी केला होता.

०६. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. १ हा तिला मारहाण व शिवीगाळ करत होता. त्याबाबत तिने सामनेवाला क्र. २ यांच्याकडे तक्रार केल्यावर, सामनेवाला क्र. २ हे देखील तिला शिवीगाळ करत होते. तसेच सामनेवाला क्र. ३ तिला मारहाण करण्यासाठी अंगावर धाउन जात होता. तिचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाले तिला शारिरीक व मानसिक त्रास देत होते. तसेच तिला माहेरुन दारुच्या परवान्याकरीता पैसे आणण्यासाठी मागणी करत होते व त्याकारणावरुन तिला मारहाण आणि शिवीगाळ करत होते. सबब तिने प्रस्तुतचा मुळ अर्ज सदर कायद्याचे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. तिने प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे कलम २० खाली आर्थिक सहाय्य,

कलम १९ प्रमाणे रहिवासी आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०७. सामनेवाला क्र. १ याने नि. क्र. १० अन्वये अर्जास म्हणणे दाखल करुन तो आव्हानीत केलेला आहे. त्याने अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्याने अर्जदाराला मानसिक व शारिरीक छळ केल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. त्याचे असे कथन आहे की, त्याने अर्जदाराच्या माहेरी अथवा तिच्या बहिणीच्या सासरी जाउन अर्जदाराला अथवा तिचा भाउ व बहिण यांच्यासोबत कोणताही वाद केलेला नाही. तो अर्जदार हिस नांदवायला तयार होता व आहे. त्याबाबत त्याने अर्जदाराला नोटीस पाठविली होती, परंतु ती अर्जदाराने स्विकारलेली नाही. त्याचे असे कथन आहे की, तो कोठेही नोकरी करीत नाही. तसेच त्याला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे त्याने अर्जदाराचा अंतरिम मागण्यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०८. सामनेवाला क्र. २ ते ५ यांना नि. क्र. १९ अन्वये बजावणी होउन देखील ते उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आला.

०९. उभय पक्षकारांची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निश्चितीकरणासाठी उपस्थीत होत आहेत. त्यावरील निष्कर्ष मी अनुमान काढून कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | सामनेवाला यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी दिसते काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | सामनेवाला यांच्याकडून अंतरिम पोटगीची रक्कम मिळणेस अर्जदार पात्र आहे काय ? असल्यास किती? | **अंशतः होकारार्थी. सामनेवाला क्र.१ याच्याकडून अर्जदार दरमहा रक्कम रु. ४,०००/- मिळण्यास पात्र आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ०३. | अर्जदार हिने मागणी केलेप्रमाणे ती निवासाचे अंतरिम आदेश म्हणून घरभाड्यापोटी रक्कम मिळण्यास पात्र आहे का ? | **नकारार्थी** |
| ०४. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

१०. अर्जदारातर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र. १ तर्फे विधीज्ञांनी त्यांच्या तोंडी युक्तीवादाच्या पृष्ठयर्थ नि. क्र. २७ अन्वये लेखी युक्तीवाद सादर केलेला आहे. त्याचे अवलोकन केले. उभयपक्षकारांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ बरीचशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. आवश्यक त्या कागदपत्रांचा उल्लेख मी माझ्या कारणमीमांसेमध्ये करीत आहे.

### मुद्दा क्र.१ व २ करीताः-

११. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दि. ०३/०३/२०१९ रोजी झालेला असल्याची बाब वादांकित नाही. तसेच, पक्षकारांतील नातेसंबंध देखील वादांकित नाही. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्या विवाहबंधनातून त्यांना कु. प्रज्वल नावाचा मुलगा झालेला असल्याची बाब देखील वादांकित नाही. त्यामुळे, अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये कौटुंबिक नातेसंबंध (Domestic Relation) असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

१२. प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी अर्जातील व म्हणण्यातील कथने अभिलेखावर आहेत. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्याच्या मुळ हेतूचा विचार करावयाचा झाल्यास तो हेतु सामनेवाला यांच्या कथनांपेक्षा अधिक महत्वाचा आहे असे मला वाटते. अर्जदार हिने अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र देऊन शपथेवर तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सांगितलेले आहे. त्यामध्ये तिने सामनेवाला यांनी तिचा मानसिक, आर्थिक व शारिरिक छळ केल्याचे कथन केलेले आहे. एखादी स्त्री विनाकारण तिच्या पती

व त्याच्या नातेवाईंकाविरुध्द हिंसाचार झाल्याबाबतची खोटी कथने करेल असे प्रथमदर्शनी मला वाटत नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी तरी अर्जातील कथने ही सत्य आहेत असे दिसते. अर्जातील नमुद कृत्ये ही कौटुंबिक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडत आहेत, त्यामुळे प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसत आहे.

१३. अर्जदारने सदर कायद्याचे कलम २३ अंतर्गत आर्थिक सहाय्य व निवासी आदेश मिळण्याची विनंती केलेली आहे. सदर कलमाखाली एखाद्या अर्जावरुन असे उघड होत असेल की, उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराची कृती करीत आहे किंवा त्याने तशी कृती केली आहे किंवा उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराची कृती करील अशी शक्यता आहे याबाबत दंडाधिका-याचे समाधान झाले असेल तर, त्याला बाधित व्यक्तिच्या शपथपत्राच्या आधारावर, उत्तरवादीविरुध्द सदर कायद्याचे कलम १८ ते २२ अन्वये अंतरिम आदेश देण्याचे अधिकार आहेत. यापुर्वीच्या परिच्छेदामध्ये प्रथमदर्शनी अर्जदारने प्रतिज्ञापत्राद्वारे सामनेवालांची कृती कौटुंबिक हिंसाचार असल्याचे सिध्द केलेले आहे. त्यामुळे, आता ही बाब पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार कलम २३ अंतर्गत अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे का ?

१४. अर्जदारचे असे कथन आहे की, तिचे कोणतेही उदरनिर्वाहाचे साधन नाही. त्याऊलट, सामनेवाला क्र.१ हा इलेक्ट्रीशियन म्हणून काम करत असून त्याला दरमहा रक्कम रुपये २०,०००/- एवढा पगार मिळतो. तो तिचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. सामनेवाला क्र. १ याने ती बाब नाकारलेली आहे. त्याचे असे कथन आहे की, तो बेरोजगार असून त्याचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्याउलट त्याचे असे कथन आहे की, अर्जदार हिच्या नावावर वडिलोपार्जीत मौजे खवली, ता. सुधागड, जि. रायगड येथे शेतजमीन आहे. त्यातून तिला पुरेसे उत्पन्न मिळते. तसेच त्याचे असे कथन आहे की, अर्जदारने तिच्या मालमत्ता आणि दायीत्वाच्या प्रतिज्ञामध्ये जो खर्चाचा तपशील दिलेला आहे तो खोटा आहे. त्यामुळे त्याने अर्जदाराची निर्वाह भत्त्याची मागणी नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

१५. त्या अनुषंगाने अर्जदारने व सामनेवाला क्र. १ यानेदेखील अर्जदारच्या नावे वडिलोपार्जीत वारसा हक्काने प्राप्त झालेली मौजे खवली, ता. सुधागड, जि. रायगड येथील मिळकतींचे ७/१२ पत्रके हजर केलेली आहेत. परंतु त्या ७/१२ पत्रकांचे अवलोकन केले असता, सन २०२१ व २०२२ या सालात त्या जमीनी पड असल्याने दिसत आहे. त्यामुळे ७/१२ पत्रकावरुन त्या शेतजमिनी मिळकतीतून अर्जदाराला पुरेसे उत्पन्न मिळते व ते तिच्यासाठी आणि मुलासाठी पुरेसे आहे असे म्हणता येणार नाही.

१६. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदारने पुर्वी मालमत्ता व दायीत्वाची जी प्रतिज्ञापत्रे दाखल केली होती. ती प्रतिज्ञापत्रे विहीत नमुन्यात व अपूर्ण माहितीच्या आधारावर दाखल केल्याबाबत सामनेवाला यांच्यातर्फे हरकत नोंदविण्यात आली होती. त्यानंतर अर्जदारने नि. क्र. २५ सोबत विहीत नमुन्यात व संपूर्ण माहिती असलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्याबाबत देखील सामनेवाला क्र. १ याची अशी हरकत आहे की, अर्जदारने त्यामध्ये जो खर्चाचा तपशील दिला आहे तो चुकीचा आहे व त्यासंदर्भातील कागदपत्रे दाखल केली नाहीत. परंतु तिने खर्चाबाबत कागदपत्रे दाखल केली नाहीत, म्हणून तिची निर्वाह खर्चाची मागणी पूर्णपणे नाकारणे न्यायोचीत होणार नाही. अर्जदारचे असे कथन आहे की, सामनेवाला हा इलेक्ट्रीशियन म्हणून काम करतो व त्याला २०,००० एवढे उत्पन्न मिळते. परंतु तो नोकरी करत असल्याबाबत अथवा त्याच्या उत्पन्नाबाबत कोणताही विश्वासाहार्य पुरावा अभिलेखावर नाही. सामनेवाला क्र. १ याच्या उत्पन्नाचा पुरावा जरी अभिलेखावर नसला, तरी देखील त्याचे वय, शरिरयुष्टी पाहता तो कामधंदा करुन चांगले उत्पन्ना मिळवू शकतो. तो बेरोजगार आहे असे म्हणून अर्जदार व मुलाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी नाकारु शकत नाही. त्या अनुषंगाने मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांच्याकडील राजनेष वि. नेहा २०२१ ऑल एम.आर.*(क्रिमीनल)* ११७२ एस.सी. या न्यायनिर्णयातील भाग ३ परिच्छेद क्र. ६२ मध्ये असे स्पष्ट केले आहे की, ज्यावेळी पतीची चांगली शरिरयुष्टी आणि शैक्षणिक पात्रता असेल, त्यावेळी तो त्याच्याकडे काही उत्पन्नाचे साधन नाही असे म्हणून त्याच्या पत्नीला सांभाळण्याच्या जबाबदारीपासून मुक्त होउ शकत नाही. त्यामुळे, अर्जदार तिच्या व मुलाच्या उदरनिर्वाहासाठी, सामनेवाला क्र.१ याच्याकडून मासिक निर्वाह भत्त्याची रक्कम अंतरिम स्वरुपात मिळण्यास पात्र आहे.

१७. अर्जदारने तिच्यासाठी व मुलासाठी दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १०,०००/- अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. सदर कायद्याचे कलम २० मध्ये नमुद केल्याप्रमाणे आर्थिक मदत ही पुरेशी, न्याय्य, योग्य व पिडीत व्यक्तीचे राहणीमानाशी सुसंगत असणे बंधनकारक आहे. अर्जदार हीला स्वतःच्या किमान दैनंदिन गरजा, दररोज वाढत जाणारी महागाई तसेच मुलाचे पालनपोषण इ. बाबींचा विचार करता दरमहा रक्कम रु. ४,०००/- (अक्षरी रुपये चार हजार मात्र) अशी पोटगी पुरेशी ठरेल असे मला वाटते. सामनेवाला क्र.१ याच्या मासिक उत्पन्नाबाबत विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर नसला तरीदेखील त्याला त्याची नैतिक जबाबदारी नाकारता येणार नाही. त्यामुळे, अर्जदार, सामनेवाला क्र.१ याच्याकडून दरमहा रक्कम रु.४,०००/- आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम अर्ज दाखल तारखेपासून देय राहील. वरील कारणांमुळे मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष त्या अनुषंगाने नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ करीताः–**

१८. तसेच अर्जदारने निवासाचे आदेश म्हणून घरभाड्यापोटी अंतरिम स्वरुपात दरमहा रक्कम रुपये ९,०००/- ची मागणी केलेली आहे. सदर कायद्याचे कलम १९ प्रमाणे निवासाचे अंतरिम आदेश देण्याची तरतुद आहे. परंतु, अर्जदारने विभागून राहत असलेल्या घरामध्ये राहण्याची मागणी केलेली नाही. त्याऊलट, तिने घरभाड्यापोटी रक्कमेची मागणी केलेली आहे. ती सध्या तिच्या माहेरच्या घरी राहत असल्याची बाब वादांकीत नाही. त्यामुळे तिच्या निवासाची व्यवस्था तिच्या माहेरच्या घरी असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. सबब ती घरभाड्याची रक्कम मिळण्यास पात्र नाही. सबब, मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष "नकारार्थी" नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीताः–**

१९. मुद्दे क्र.१ ते ३ मध्ये केलेल्या सविस्तर कारणमीमांसेच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज (निशाणी क्र.५) अंशतः मंजुर करणेत येत आहे. |
| ०२. | अर्ज दाखल तारखेपासून अंतीम आदेशापावेतो पोटगीची रक्कम म्हणून सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु. ४,०००/- (अक्षरी रुपये चार हजार मात्र) द्यावेत. |
| ०३. | सदर आदेशाची प्रत विनामुल्य उभय पक्षकारांना देण्यात यावी. |
| ०४. | खर्चाबाबतचे आदेश मुळ अर्जातील अंतिम आदेशाप्रमाणे. |

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2023.01.31 16:14:19 +0530

दिनांकः ३१/०१/२०२३.
खालापूर.

**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापूर.